

# व्यक्तिमत्त्व विकास आणि भाषिक कौशल्ये

संपादक
नीला जोशी

सस्नेह भेट

# व्यक्तिमत्त्व विकास आणि भाषिक कौशल्ये

संपादक
नीला जोशी

प्र का श न

**व्यक्तिमत्त्व विकास आणि भाषिक कौशल्ये**

नीला जोशी

ISBN : 978-93-85127-31-1

© नीला जोशी

पहिली आवृत्ती

फेब्रुवारी २०२०

**प्रकाशक**

दर्या प्रकाशन

१०५, व्यंकटेश्वरा टॉवर्स,

इच्छापूर्ती गणेश मंदिराजवळ,

भारती विद्यापीठाच्या मागे, पुणे.

मोबा.: ७८४१०५६३०१/७७७५८१५५३०

**मुद्रक**

भारती मुद्रणालय

८३२ ई, शाहूपुरी ४ थी गल्ली,

कोल्हापूर - ४१६००१.

फोन : ०२३१-२६५४३२९

**किंमत : ₹ २५०/-**

# अनुक्रम


संपादकीय ........ ५

१. बीजभाषण/राजन गवस ........ १५

२. भाषिक कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकास/नंदकुमार मोरे ........ २६

३. श्रवण कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास/
श्यामसुंदर मिरजकर ........ ३५

४. श्रवण कौशल्य एक जीवन कौशल्य/महेश गायकवाड ........ ४३

५. श्रवण कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास/राजेश पाटील ........ ५९

६. वाचनकौशल्य : संपन्न व्यक्तिमत्त्व विकासाची पाऊलवाट/
रणधीर शिंदे ........ ६६

७. साहित्याचे वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकास/शोभा नाईक ........ ७५

८. अभिवाचनाचे अवतार/रमेश साळुंखे ........ १००

९. अभिवाचन : पूर्वतयारी आणि तत्त्वे/तातोबा बदामे ........ ११३

१०. लेखन कौशल्ये/मानसी लाटकर ........ १२१

११. सर्जनशील लेखन आणि व्यक्तिमत्त्व विकास/रफीक सूरज ........ १३२

१२. लेखन कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास/गीता गवस ........ १३९

१३. चित्रपट : सर्जनशील कलाप्रकार/तेजस चव्हाण ........ १६१

१४. भाषण कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास/एकनाथ पाटील ........ १७३

१५. संवाद कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास
यातील सहसंबंध/अनीश जोशी ........ १८७

१६. कविता सादरीकरण/श्रद्धा पाटील ........ १९२

१७. कुस्ती निवेदन : एक भाषिक कौशल्य/मतीन शेख ........ १९७

१८. प्राण्यांची देहबोली/दत्ता मोरसे ........ २०२

१९. विषय सूची ........ २०९

# साहित्याचे वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकास

**शोभा नाईक**

साहित्याचे वाचन का हवे? वाचन हा मानवी संस्कृतीचा मूलभूत पाया आहे. संस्कृती म्हणजे भाषाच. भाषेमुळेच संस्कृतीचाही विकास होत असतो. संस्कृतीचा विकास म्हणजे भाषेचा विकास आणि भाषेचा विकास म्हणजेच अभिव्यक्तीचा विकास. जीवनाला अनेक कला संपन्न करत असतात. सर्व कला अभिव्यक्तीच साधत असतात. भाषा ही सुद्धा एक कलाच आहे. कारण तीही अभिव्यक्ती साधत असते. तिच्यामध्ये दृक व श्राव्य या माध्यमांचीही अंगे सामावलेली असतात. चित्रकार रंग रेषेद्वारे स्वतःला अभिव्यक्त करत असतो, संगीतकाराचे स्वर, गीतकाराचे गायन हे माध्यम. पण लेखक भाषेच्या माध्यमातून कलाकृती निर्माण करत असतो. भाषा शब्द या माध्यमातून साकार रूपात येते. शब्द या माध्यमाचा नाद, लय, ताल, रंग, गंध व रस या सर्वच कसोट्यांशी थेट संबंध असतो. शिवाय त्यामध्ये लेखक या व्यक्तीची वैचारिक भूमिका सामावलेली असते. म्हणून लेखकासारख्या प्रज्ञावंत व्यक्तीची भाषिक अभिव्यक्ती ही त्याच्या व्यक्तिमत्वाचा आराखडा वाचकाला दाखवत असते. त्यामुळे इतर कला आणि साहित्य कला यातील आस्वादाचे स्वरूप भिन्न बनत असते. वाचन या कृतीत माणसाच्या बौद्धिक अंगाचे विकसन सामावलेले असते. त्यात दृक व श्राव्य ही कौशल्ये कृतिशील होतात तसेच कल्पना व चमत्कृती ही समजून घेण्याच्या प्रक्रियेतील अंगेही त्यात सामावलेली असतात. दूरदर्शन अथवा चित्रपटात दृश्य पडद्यावरून झरझर पुढे सरकते. त्या दृश्यांचा मेंदूवर ठसा उमटण्याआधीच ती

पडद्यावरून पुसली जात असतात, एका मागोमाग अशी झपझप दृश्ये कोसळत असतात तिथे, पण साहित्याचे वाचन निराळा प्रत्यय देत पुढे पुढे जात असते. वाचनातून आपण डोळ्यांनी शब्द या जड माध्यमाच्या साहाय्याने तरल असे अनुभूतींचे अलौकिक इंद्रधनुष्य आपल्या कल्पनेच्या बळावर अनुभवत असतो. आपल्या मेंदूतील संवेदनांची, अनुभव प्राप्त करण्याची आकलन क्षमता वाढविण्याची केंद्रे वाचन प्रक्रियेवाटे झगमगत असतात. त्यांना चालना मिळत असते, ती जिवंत होऊन उठत असतात, त्यांना जितके कार्यरत करता येईल तितकी त्यांची क्षमता वृद्धिंगत होणार असते. हे सारे व्यक्तिमत्त्व प्राप्तीकडे जाणारे मार्ग होत.

## शब्द आणि अन्वर्थयुक्त भाषा

भाषा हे मानवी जीवनाचं सर्वसमावेशक असं क्षेत्र आहे. भाषा ही अर्थातच शब्दयुक्त असते. एखाद्या पिकाचं जसं शेत असतं तसंच जगण्यातही शब्दांचं शेत पिकवलं जात असतं. ही शब्दांची शेती अनादिअनंत काळापासून शतकाशतकांची अनुभवविश्व आपल्यात मुरवून घेत अनेकानेक विधानांची शिदोरी सोबत घेऊन चालत येते. संदर्भानुसार नव्यानव्या आकलनानुसार शब्द नवीनवी निर्मिती साधत राहतात, जुन्या सकस बियाणांतून नवं नवं पीक घेण्यासाठी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आपल्या बियाणांचा वारसा सुपुर्द करत राहतात. शेतकऱ्याला जसं आपल्या शेतजमिनीत अंगमेहनतीचा घाम गाळून सुयोग्य असं शास्त्रोक्त सतर्कतेचं नियोजन करून पीकपाणी पिकवावं लागतं; तसंच लेखक आणि वाचक यांना भाषा हे जीवनातील अन्वर्थांचं शेत शरीर, मन, हृदय, बुद्धी यांच्या अंगमेहनतीनं पिकवावं लागत असतं. पेरण्यासाठी शेतकऱ्याकडे मूठभर दाणे बियाणांच्या रूपात असावेच लागतात, मगच त्यातून खंडीभर दाण्यांच्या धान्यराशी घरी आणता येतात. हे जसं आहे तसेच लेखकांना आणि वाचकांनाही शब्दरूपी बियाणं आपल्या 'कणगी'त जतन करून ठेवावीच लागत असतात. कलावंतांना वेळोवेळी जगण्याच्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष अनुभवातून जाताना शब्दरूपी बियाणांची पेरणी करून अनुभूतीरूपी धान्याची समृद्धी प्राप्त करायची असते. त्यांचे अनुभव वेचणे 'राब' असल्याप्रमाणे आणि अनुभूतीची अन्वर्थक अभिव्यक्ती म्हणजे पिकाला फुटलेली कणसं असल्याप्रमाणे. वाचकाला ही साहित्यकृतीरूपी कणसं जगण्याला आवश्यक असणारी ऊर्जा मिळवून देण्यासाठी तत्पर असतात. वाचकांना स्वतःला जर सकस जाणिवांनीयुक्त असं घडवायचं असेल तर साहित्यकृतीचं वाचन त्यांना डावलताच येणार नाही. तात्पर्य, व्यक्तिमत्त्व घडणीत साहित्याचं वाचन याला

अन्य पर्यायच आढळत नाही. माणूस अन्नाशिवाय, घराशिवाय राहू शकेल पण भाषेशिवाय त्याला राहता येत नाही. भाषा ही सर्वात महत्त्वाची संपत्ती असते आणि साहित्याची भाषा तर अनुभवांची शिदोरी व त्यातून रसग्रहणयुक्त अनुभूती ती देऊ करत असते. अस्सल भाषा घडते ती साहित्याच्या वाचनातून. भारतात फार मोठी परंपरा आहे भाषा म्हणजे काय याचा शोध घेण्याची. भाषा सर्वस्व असते जगण्याचे म्हणूनच वर्चस्ववादी प्रवृत्ती नेहमी त्याच अंगावर आपले नियंत्रण निर्माण करत आलेले दिसतील. तात्पर्य, भाषा अत्यंत महत्त्वाची आणि त्यातूनही आपल्या मातृभाषेतील साहित्याची भाषा ही आपल्याला आपली ओळख पटवून देणारी, खऱ्या अर्थाने आपल्या व्यक्तित्वाला जन्माला घालणारी आईच.

'वाचन-लेखन आणि व्यक्तिमत्त्व विकसन'-या विषयाचा संबंध थेट माणसाशी पोहचतो. वाचन आणि लेखन ही माणसानं प्राप्त केलेली खास कौशल्यं आहेत. आपल्या बुद्धिमत्तेच्या बळावर आजवर अनेकानेक शोध माणसानं लावले असतील, त्यानं विमानासारखे किंवा अचंबित करणारे वैद्यकशास्त्रातले अनेकविध चिकित्सेचे प्रकार शोधले असतील, माध्यमांचं कमालीचं तंत्रज्ञान त्यानं शोधलं असेल; पण सर्वाधिक महत्त्वाचा जर कोणता शोध त्यानं लावला असेल तर तो आहे लिपीबद्ध भाषेचा शोध. माणूस किती प्रज्ञावंत प्राणी आहे त्याचीच हा शोध म्हणजे एक सर्वश्रेष्ठ साक्ष ठरेल. भाषा आणि तिची लिपीबद्धता या विषयाच्या आवाक्यात मानवाच्या संवेदनशील असण्याच्या साक्षी सामावतात तसेच त्याला सभोवतालच्या अद्‌भुत निसर्गाच्या अस्तित्वाशी जोडणारा तोच एकमेव सेतू असल्याचं वास्तव सामावतं. संवेदनांच्या, ज्ञानप्राप्तीच्या, अनुभव आणि अनुभूतींच्या प्रक्रिया त्यामध्ये सामावतात.

भाषेचा शोध आणि त्यातील वाचन व लेखन या कौशल्यांचं विकसन म्हणजेच त्याला स्वतःच्या संवेदन प्रक्रिया लक्षात घेण्याचं सुचणं. मानवाला निसर्गाकडून पंचेंद्रिये लाभलेली होती पण त्या पंचेंद्रियांना ज्ञानेंद्रियांत परावर्तित करण्याची माणसाची निकड माणसाच्याच लक्षात आली तेव्हा वाचन आणि लेखन ही कौशल्ये सिद्ध झाली. तर भाषेचा एक शोध लागल्यावर अशा अनेक गोष्टी मानवाच्या वाटचालीत साकारत गेल्या. मानवी जीवनात संस्कृतींचं अस्तित्व निर्माण झालं आणि मानवानं शोधलेल्या, विकसित केलेल्या संस्कृतींचं स्वरूप प्रसारित करत असताना किंवा समाज आकारास आणत असताना भाषिक कौशल्य हे अनेक चळवळींचं माध्यम बनलं. त्यामुळे वाचन आणि लेखन या कौशल्यांचे

प्रशिक्षण देणारी यंत्रणा प्रामुख्यानं शिक्षण क्षेत्रात राबविण्यात येऊ लागली. माणूस अथवा व्यक्ती अथवा नागरिक घडविण्याच्या उद्दिष्टपूर्तीसाठी शिक्षण क्षेत्राचं नियोजन प्रत्येक देश आपापल्या पद्धतीनं करतोच आणि त्या अंतर्गत वाचन व लेखन हीच कौशल्यं शिकण्याची म्हणजेच व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी उपयोजित कौशल्य-माध्यमं म्हणून नियोजित असतात.

त्यासाठी व्यक्ती घडावी म्हणून वाचन आणि लेखन हे आवश्यक प्रशिक्षण विद्यापीठ शिक्षण प्रक्रियेत नियोजित केलं गेलेलं आहे. वास्तविक आधुनिक शिक्षण पद्धती काय किंवा प्राचीन गुरुकुल शिक्षण पद्धती काय त्यातून वाचन आणि लेखन याच माध्यमांचं उपयोजन करण्याचा पायंडा पडला आहे. पण आज मात्र हीच सर्वाधिक विशेष गोष्ट तंत्रज्ञान विकसित झाल्यावर हडबडून गेलेली आपण पाहात आहोत. वाचन आणि लेखन या वास्तविक व्यक्तिमत्त्व घडणीतील मूलभूत गोष्टी असूनही जर त्या या वर्तमानात अशा हडबडत असतील तर वर्तमान आपण अत्यंत गांभीर्याने तपासलंच पाहिजे. प्राचीन दिवसांमध्येही एके काळी असंच वर्तमान अवतरलेलं होतं. त्या काळात वाचन आणि लेखन हीच प्रक्रिया अठरापगड समाजाला वंचित केली गेली होती, पुन्हा आजही वेगळ्या अर्थी तंत्रज्ञानाच्या विळख्यानं तेच करायला सुरुवात केली आहे! वाचनाची आडकाठी कोणीही करत नसतानाही वाचन व लेखन या गोष्टी आज अप्रूप होऊन बसल्या आहेत. वाचनाच्या बाबतीत तर आजची परिस्थिती अधिकच गंभीर बनलेली दिसत आहे. कारण सर्व काही असूनही एक विकसित व्यक्तिमत्त्वाचा अभाव असेल तर सर्व काही असण्याला तसा काही अर्थ शिल्लक राहात नाही, अशी विचित्रच कथा आज पाहायला लागते आहे. तंत्रज्ञानाच्या अतर्क्य शोधांच्या पर्यावरणात अफाट जग अगदी जवळ आलेलं आहे खरं; पण माणूस माणसापासून कोसो दूर झाला आहे. हातात online संच जरूर आले आहेत पण माणसं आणि त्यांची मनं एकत्र येणं हेच अशक्य कोटीतलं स्वप्न बनलं आहे. कसदार साहित्यातील शब्दशक्तीकडे पाठ फिरवणाऱ्या दिवसांना अनेक अनर्थांना सामोरं जावं लागणार.

### आज भेडसावत असणारी चिंता

'साहित्याचे वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकसन' या विषयाचा विचार करताना सर्व प्रथम आज मानवी जीवनाला भेडसावत असणारी चिंता ग्रासू लागते. आपण आज एकविसाव्या शतकात आहोत. तंत्रज्ञानाने अनेक बाबतीत कमाल केलेली असतानाही या शतकात अनेक समस्या आपल्यासमोर आहेत. उलट काही समस्या

आपल्या अस्तित्वाच्या संदर्भातून अतोनात कठीण परिस्थितीमध्ये आपल्याला टाकत असल्याचे दिसू लागले आहे. त्यामधील सर्वाधिक गंभीर अशी भेडसावणारी समस्या म्हणजे आपले ज्ञानव्यवहार, संवेदन व्यवहार, जाणीव- नेणीवांच्या नोंदींचे व्यवहार चालतात त्या माध्यमांच्या म्हणजेच आपल्या भाषांच्या संदर्भातील समस्या. काय आहे ही नेमकी भाषांच्या संदर्भातून निर्माण झालेली समस्या? साहित्याची भाषा आपल्याला कोणती भाषा प्रदान करते? पण आपण ती भाषा आत्मसात करत आहोत का? साहित्याच्या भाषेची संगत तुटल्यावर कोणते चित्र निर्माण होणार? आजकाल प्रत्येक वस्तूची किंमत लोकांच्या लक्षात येते, परंतु कशाचेही मूल्य समजत नाही. हे ऑस्कर वाइल्डनेही केलेले विधान आणखी दुसरे काय सांगते? मूल्य हरवल्यावर जगात काय उरते? महनीय साहित्यकृती मूल्य हृदयाशी जपण्याची प्रेरणा देणारा सर्वाधिक महत्त्वाचा मंच असल्याचे कोण नाकारेल का? मानवी समाजाने काळानुरूप सुसंस्कृत आणि जबाबदार होत वाटचाल जर केली तरच पृथ्वी सुरक्षित राहील नाहीतर मा. नेमाडे अधोरेखित करतात त्याप्रमाणे मानवात दडलेली ऱ्हासशील वृत्ती दिवसेंदिवस उग्र बनून साराच विध्वंस करेल. स्वतःला टिकवायचे तर पृथ्वी टिकली पाहिजे आणि पृथ्वी शुद्ध स्वरूपात टिकली तरच आपण टिकू हा संस्कार खोलवर टाकणाऱ्या श्रेष्ठ साहित्याची संगत घट्ट असणे आवश्यक. सभोवताली पसरलेली ऱ्हासशील प्रकृती शुद्ध पर्यावरणाचा, मूल्यांचा, नैतिक धोरणांचा, निखळ स्वातंत्र्याचा, अंतरंगाच्या प्रबुद्धतेचा विनाश करण्याच्याच दृष्टीतून कार्यरत कशी असते याची प्रत्ययकारक प्रभावी दर्शने साहित्यात उमटत असतात.

पण सगळीकडून हाकाट्या सुरू आहेत की आजकाल कोणाला साहित्य वाचनाची आवड लागत नाही. पुस्तकासाठी कोणाकडे आजकाल वेळ नाही. अर्थात पुस्तक वाचायचे तर त्याला वेळ हा द्यावाच लागतो. जर त्यासाठी आपल्याकडे वेळ नसेल तर मग या तंत्रज्ञानयुक्त जगात, पूर्वीच्या तुलनेत आज भरपूर वेळ, उसंत मिळत असलेल्या जगात आणखी कोणती अशी कामे माणसाला लागत आहेत की त्याला वाचन या दालनात काही काळही स्वतःला वावरत ठेवता येत नाही आहे? आपल्याकडे आवड असेल तर सवड आपोआप मिळते असे मानले जात असे. पण मग या समजुतीप्रमाणे विचार केला तर वाचनाची आवडच कमी झाली आहे का? वेळ नाही हे निमित्त फक्त आपण पुढे करत आहोत का? ग्रंथांचे वाचन कमी होण्यामागचे खरे कारण काय असावे मग?

आपल्याला पुस्तकांपेक्षा अन्य गोष्टींची आकर्षणे जास्त वाटत आहेत हे खरे कारण असेल का?

तर अलीकडे वाचनाला धरून ही जी चिंता भेडसावत आहे ती दूर करता येऊ शकेल का याचा आपल्याला विचार करावाच लागेल. या चिंतेचे मुख्य कारण असलेल्या अन्य गोष्टींच्या आकर्षणापासून आपण स्वतःला सोडवून घेऊ शकत नाही आहोत ही गोष्ट ज्ञान व्यवहारास ग्रासत निघाली आहे. चंगळवादाच्या आहारी गेल्याने आपल्यावर ही परिस्थिती ओढवलेली आहे. केवळ चंगळवाद की आणखीही काही कारणे त्यामागे आहेत? आपण याचा साहित्याचे वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकसन या संदर्भातून विचार करत असता या ठिकाणी मागोवा घेण्याचा प्रयत्न करू शकू. साहित्याच्या वाचनातून किंवा एकूणच साहित्य व्यवहारातून समाजात व्यक्तिमत्त्वे निर्माण होतात ही वस्तुस्थिती आहे. आज या चंगळवादी जगात साहित्याच्या संदर्भातून निर्माण झालेले हे वास्तव; समाजात चालत आलेल्या प्रस्थापित व्यवस्थेत तर निर्माण होत नाही आहे ना? साहित्य नेहमी विकसित समाज निर्माण करण्याचे लक्ष्य ठेवत असताही त्याच्या अस्तित्वाकडे आपण म्हणावे तसे लक्ष पुरवत नाही आहोत याचा अर्थ काय होतो?

भारतीय समाजात पूर्वीपासून एक विशिष्ट अशी ज्ञान परंपरा किंवा आपण त्याला आविष्कार परंपरा असेही म्हणू शकतो ती चालत आली. तर ही परंपरा मौखिक आणि लिखित अशा दोन स्वरूपात पुढे चालत आली. मौखिक प्रवाहातून लोकपातळी तर लिखित प्रवाहातून अक्षरबद्ध भूमिकांची अस्तित्वे आपल्या दृष्टीसमोर तरळतात. अक्षरबद्ध संवेदन, व्यवहार याच्याशी साहित्य ही शाखा निगडित असते. साधारण दहाव्या शतकामध्ये ब्रह्मदेशात लिपीचा शोध लागल्यानंतर तिथे बुद्ध जातक कथांचे संस्मरण लिखित स्वरूपात करण्यास सुरुवात झाली, त्याच सुमारास भारतात पुराणांचे संस्करण सुरू झाले, आणि लिखित साहित्य व लोक पातळी यांच्यात एक सेतू अस्तित्वात आला. लोकसाहित्याचे अथवा मौखिक साहित्याचे स्वरूप पाहिले की मानवी जीवन संस्कृती प्राचीन काळीच विकास पावलेली होती, याची कल्पना येते. तर आपल्या देशाच्या आधुनिक वाटचालीने साहित्य या शाखेअंतर्गत त्या वाटचालीशी स्वतःला जोडून घेण्याची पावले टाकण्याची दिशा प्राप्त केलेली असताना ही शाखा जीवनाच्या आजच्या अर्थकेंद्रित वाटचालीत तर अगदीच बाजूला केली जाणे याचा अर्थ काय होतो?

साहित्य आपल्यात शतकानुशतकांचे व्यक्तिमत्त्व सामावून घेत असते. भारतीय जीवन व्यवहाराने शतकानुशतकांपासून विशिष्ट असे संकेत व्यवहार निर्माण केले, ते काळाच्या ओघात दृढ झाले. चांगल्या-वाईटाच्या संकल्पना येथे अस्तित्वात आणल्या. आपली जीवन संस्कृती निर्माण करत आणली. कुटुंब व समाजभूमी येथे अस्तित्वात आली. ही शतकांचे स्पर्श धारण करत चालत आलेली जीवननीती व्यक्तीला घडवत आली. तिच्यासमोर आदर्श व्यक्तिमत्त्वे परंपरांनी ठेवली. व्यक्ती ज्या प्रदेशात जन्मते त्या प्रदेशाचे जीवनाच्या वाटचालीतून निर्माण झालेले रंग-गंध आपल्यामध्ये धारण करतच आपले स्वरूप ती प्राप्त करते. त्यामुळे भारतात जन्मणारी व्यक्ती ही ठरावीक भारतीय व्यक्तिमत्त्वाची बनते. आपल्याकडे भारतीय असणे आणि महाराष्ट्रीय असणे अथवा कर्नाटकी असणे हे व्यक्तिमत्त्वासंदर्भातील वास्तव आहे. प्रादेशिक पातळीवरून संकेत व्यवहार कार्यरत असतात त्याचे ते फलित आहे. आपल्याकडे संस्कृती विविध रंगागंधांची असते त्यामुळेच भारतीय असण्याला विलक्षण सौंदर्याचा स्पर्श लाभतो. प्रादेशिकतेतून, विविध मायबोलींतून प्राप्त होणारे हे सौंदर्य जर अबाधित राहिले नाही तर भारतात बाका प्रसंग ओढवण्याची चिन्हे राजकीय पातळीवरूनही निर्माण होऊ शकतात. भारत हा अनेक भाषांची साहित्य संस्कृती चालवत आलेला देश ही आपली ख्याती जतन करणे आवश्यक ठरते.

भारतीय मुले नेहमी कुटुंब आणि समाजाच्या आवाक्यातच वावरत मोठी होत आली. घर, दार, रस्ता, भोवताल, शाळा व शैक्षणिक पर्यावरण, सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देत असते हे आपले अनुभवविश्व. पण आज या वास्तवात मूलतः बदल झाला आहे. आपण अत्याधुनिक अशा एकविसाव्या शतकात आहोत त्यामुळे हे चित्र बदलत निघाले आहे. आपली मुले कोणत्या भावविश्वाची घडत आहेत, हेही त्यांच्या खुद्द जन्मदात्यांना समजू नये असे दिवस आपल्यासमोर उभे राहिले आहेत. गोंधळाचे अनागोंदीचे आणि अराजकाचेही दिवस आपल्यावर कोसळत आहेत. अशा काळात वाचन आणि त्यातूनही साहित्याचे वाचन हा घटक अधिक निकडीचा होऊन बसतो. तर कधी नव्हती इतकी आज शाळेवर, शिक्षकांवर आणि पालकांवर आपल्या पाल्याच्या/विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व घडणीकडे लक्ष देण्याची वेळ येऊन ठेपली आहे. पालकवर्गाने अधिक सतर्क होण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. वाचन वा अक्षरांचा सहवास याला भारतात काही फार दीर्घ परंपरा नसली तरीही

प्राचीन काळापासून चालत आलेली श्रुती-परंपरा आपल्याकडे दीर्घकाळ चालत आलेली आहेच. मात्र आज त्या परंपरेला काहीशी बदलून घेत 'अक्षरबद्ध शब्द-श्रुती परंपरा' निर्माण करण्याची नितांत निकड येऊन ठेपली आहे. ज्यात अक्षरांचा म्हणजेच शब्दांचा दृक व श्राव्य प्रत्यय घेण्यातून चिंतन, मनन व आकलन यातून आपले विकसन या प्रक्रियांचा समावेश असतो. तर अशा महत्त्वपूर्ण प्रक्रियेपासून समाजाने दूर जाणे ही गंभीर बाब होईल.

**सकस साहित्याच्या वाचनाकडे वळणे – भारतीय ज्ञान परंपरांचे पुनरुज्जीवन-**

'ऋग्वेद' हा जगातील आद्यग्रंथ भारताने प्रस्तुत केला. या देशात लेखन कलेला अशी प्राचीन परंपरा आहेच; पण त्याचबरोबर श्रुती व स्मृती या संवेदन व्यवहाराशी निगडित ज्ञान परंपरांचे अस्तित्वही येथे अति प्राचीन आहे. पण सद्य वर्तमान मात्र आधुनिक जगाच्या कलाने या सर्व परंपरांचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी करत असलेला दिसतो. प्राचीन काळात या परंपरा ठराविक पद्धतीने चालविण्याचा एक वर्चस्ववादी प्रयत्न झाला, एकाच वर्गापुरत्या या प्रक्रिया मर्यादित होऊन गेल्या. पण हे निर्माण झालेले एकाकारी वळण मध्ययुगातील संतांच्या देशी परंपरेने बऱ्यापैकी मोडून काढण्यात यशही मिळवले. त्यांनी ज्ञान बंदी उठवली. पुढे ब्रिटिशांच्या काळात जोतिबा फुले आदि सामर्थ्य निर्माण झाल्यामुळे आपल्या अठरापगड समाजात दृढ असलेली पारंपरिक अक्षर बंदीही उठवली गेली. पण ती पारंपरिक भारतीय विषमतायुक्त समाजात चालत आलेली अक्षरज्ञान बंदी उठविण्याची त्या काळातील राजकीय सत्तेने उचललेली पावले. अर्थातच केवळ राजकीय स्पर्शातून कृतिशील झालेली होती त्यामुळे त्याच्यातून निर्माण झालेले दुष्परिणाम आज आपण पाहात आहोत. भारतीय अक्षर ज्ञानासंदर्भातील समाजाची उदासीनता याबाबतचा आजच्या पर्यावरणाचा विचार आपल्याला अधिक गंभीर करतो. चक्रधर-गोविन्दप्रभू यांच्या प्रेरणेतून महानुभाव पंथ आणि वारकरी संतांकडून मराठी भाषेत साहित्य निर्मिती करून त्यायोगे जी भूमिका निर्माण करण्याचा प्रयत्न झाला त्याकडे आपले लक्ष केंद्रित करावे लागेल. त्याचबरोबर खालील प्रश्नांच्या अनुषंगाने चिंतन प्रवृत्त व्हावे लागेल.

मराठी साहित्यात अस्तित्वात आलेला वैचारिक व ललित साहित्य प्रकारांचा पैस आपण नीट लक्षात घेतो का?

आपल्या अठरापगड समाजाच्या दैनंदिनीत कसदार साहित्याची जागा दृढ झालेली आहे का?

सकस साहित्याचे सुजाण वाचक निर्माण होत आहेत का?

व्यक्तिमत्त्वप्राप्त मराठी लेखक मोठ्या संख्येने अस्तित्वात येत आहेत का?

लेखक, कवी व नाटककार यांचे त्यांच्या जाणिवा, भूमिका, त्यांचे वाङ्मयीन चारित्र्य ज्यामध्ये त्यांची प्रभाव वलये, त्यांनी निर्माण केलेला वाचक वर्ग यांचाही विचार करण्यासंदर्भातून ठसठशीत वर्गीकरण करण्याची येऊन ठेपलेली निकड मोठ्या संख्येने वाचकांना लक्षात येईल का? (या प्रकारच्या सुजाण वाचकांची संख्या अत्यल्प असते पण ती वाढण्याची निकड ओळखून आपण काय प्रयत्न करावेत?)

चंगळवादी प्रवृत्तीतून जीवनाची अनुभूती घेणारी व तीच अनुभूती साहित्यात केंद्रवर्ती ठेवण्याचा अट्टाग्रह जोपासणारी प्रजा मग ती साहित्यिकाची असो अगर वाचकाची असो, ती अधोरेखित करण्याची कसोटी सामान्य वाचकही केव्हा आत्मसात करणार आहेत?

**भारतीय समाज भूमीमध्ये सकस साहित्य रुजण्यातील वर्तमान अडथळे–**

साहित्याकडे नेमकेपणाने पोहोचण्यासाठी वाचन हाच एकमेव मार्ग असतो. बाकी दृक व श्राव्य माध्यमे निराळ्या जातकुळीची असतात. वाचन हे मानवी मेंदूला अधिक सतर्क करणारे अद्‌भुत रसायन असते. त्याला दुसरा पर्याय खरेतर सापडणार नाही. वाचन या प्रक्रियेत दृक, श्राव्य ही कौशल्ये त्याचबरोबर चिंतन आणि मनन हे घटक कार्यरत होत असतात. त्यायोगे मृतावस्थेत असणारे विचार जिवंत होऊन उठत असतात. वाचन या प्रक्रियेतून वाचकाचा जिवंत स्वरूपाचा नवनिर्मिती साध्य करण्याचा सहभाग सुरू असतो. वाचकावरच साहित्यकृती बोलकी होणे निर्भरित असते. संवेदनशील वाचकवर्ग असेल तरच त्या त्या भाषांतील साहित्यकृती प्रवाहित राहतात. साहित्य टिकवणारा जिवंत वाचक निर्माण झाला पाहिजे. पण जर हा वाचक निर्माण होण्यात खंड पडेल तर साहित्याच्या क्षेत्रातच फार मोठा पेच निर्माण होईल. साहित्य हे साहित्यिकापुरतेच राहिले तर ते काय मोलाचे? जगावर 'राज्य' हवे असणाऱ्या सत्तांना हे जिवंत माणसांचे जग कितपत रुचेल?

केवळ ग्राहक हव्या असलेल्या या जागतिक बनलेल्या दिवसांना अनेक खिंडारे निर्माण करण्यात 'मोठ्या माशां'ना यश येत आहे. समाजाने शहाणे राहता कामा नये, हे येथील प्रस्थापित व्यवस्थेचे ब्रीद चंगळवादी प्रवृत्तीच्या फोफावण्यातून अधिक यशस्वी होत असलेले दिसत आहे. वाचन, चिंतन, मनन, लेखन आणि भाषण ही डोळस जाणिवा निर्माण करण्याची शिडी (जिचा आग्रह नरेंद्र दाभोळकर

धरत असत...) आज कोलमडलेली दिसते आहे. वाचन ही समाजाला योग्य आणि अयोग्य काय याची डोळस कल्पना निर्माण करून देण्याची एक मजबूत शिडी वास्तविक. तर समाजात डोळस जाणिवांनीयुक्त निर्णयक्षम माणसे निर्माण करू शकेल, अशी ही मजबूत शिडी पुन्हा एकदा हरवते आहे.

एकीकडे पूर्वीसारखी कुटुंब आणि समाज ही व्यक्तिमत्त्व आकारणारी भूमी ओसरत निघाली आणि दुसरीकडे शाळांच्या माध्यमातून प्राप्त व्हायला हवी ती शिडीही नाही, अशी आजच्या तरुण पिढीची अवस्था आपण निर्माण करत आहोत. अर्थात हे आपणच निर्माण करत आहोत. आपण आपली जबाबदारी नीट पार पाडत नसल्यामुळे ही अवलक्षणी वस्तुस्थिती ठेपली आहे. केव्हाही आपल्या उगवत्या पिढीच्या गोंधळाला किंवा अपयशाला त्याची वडिलधारी पिढी अप्रत्यक्षरित्या कारणीभूत असते असे आपल्याकडे समजण्यात येत असे. त्यानुसार विचार केला तर समाजात वाचनाला धरून जी दूरवस्था निर्माण झाली आहे त्याला कारण त्याविषयीची जबाबदारी देण्यात आलेली संबंधित माणसेच. यामध्ये पहिले खापर फुटेल ते शिक्षक वर्गावरच. कधीही कशाचीही वेळ जात नाही असेही आपल्याकडे म्हणतातच त्यामुळे हे खापर फुटून त्याचा धुरळा उडण्याआधीच शिक्षक वर्गाने जागे झाले पाहिजे. आपल्यावर केवळ आपल्या पोटच्या पोरांना अमेरिकी प्रगती साधायला लावण्याची जबाबदारी आहे असे नाही तर आपल्या ज्ञान परंपरांचे डोळस भान त्यांच्यात यावे, प्रकृतीला/सृष्टी देवतेला टिकविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या संवेदनांचे महत्त्व समजून घेण्याचे अंग त्यांच्यात निर्माण करून दिले पाहिजे, याही जबाबदाऱ्या आपल्यावर आहेत. आपल्या काळजाचे घड असलेल्या आपल्या पोटच्या लेकरांप्रमाणेच आपला विद्यार्थीही आहे याचे विशेष भान आपण अग्रस्थानी आणले पाहिजे.

आपल्या मातीत जन्माला आलेला 'अब्राहम लिंकन' आपल्याला काय सांगेल याची कल्पना आपण करू शकतो. तर प्रत्यक्षात आपल्याकडे जन्माला न आलेल्या लिंकनची आपण कल्पना करू किंवा आपल्याकडे या विचारसरणीचे लिंकन कोण कोण आहेत त्यांचा शोध घेऊ आणि त्यांच्या आवाहनांचा गांभीर्याने विचार करू. समाजात व्यक्तिमत्त्वाला खऱ्या अर्थी सन्मान मिळावा असे व्यक्तिमत्त्व आपल्या मुलाबाळांना, आपल्या विद्यार्थ्यांना कमावता आले पाहिजे यासाठी आवश्यक ती माती आपण त्यांना उपलब्ध करून देऊ, अशी प्रत्येकाने प्रतिज्ञा केली पाहिजे. कसदार साहित्य, कसदार व्यक्तिमत्त्व आणि कसदार समाज हे

घटक अस्तित्वात येण्यासाठी त्यांच्या परस्पर मेळाचे चित्र रेखावे लागेल. त्यांचे संघटन हे दुर्लभ स्वप्न नसून ते सहज निर्माण करता येण्यासारखे आहे यावर साहित्यिक क्षेत्राचा विश्वास निर्माण व्हायला हवा.

शिक्षण क्षेत्राची आपल्या देशात स्वातंत्र्योत्तर काळात व्यवस्था अस्तित्वात आणली गेली ती याच कारणाने खरेतर. आपल्याला त्या अंतर्गत एक आदर्श असे राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व आकारास आणायचे असते पाहा. सर्वच अभ्यासक्रम तेच ध्येय ठेवतात. असे असूनसुद्धा आज संपन्न व्यक्तिमत्त्वाचे दुर्भिक्ष्य का कोसळतेय? तर या राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व निर्माण करावयाच्या अभ्यासक्रमांना स्वतंत्र स्वायत्त स्वयंसिद्ध अवकाश शोधण्यास प्रवृत्त करणाऱ्या साहित्याच्या अभ्यासाची जोड नेमकेपणाने देण्यात आलेली आहे का? आपापल्या भाषांतील सकस साहित्य विद्यार्थ्यांसमोर सतत ठेवणारे अभ्यासक्रम नियोजित केले जातात का? साहित्याचे अभ्यासक्रम हे केवळ भाषेच्या विद्यार्थ्यांनीच शिकावेत आणि इतर वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान, कायदा इ. शाखांचे त्याच्याशी संबंधच नसावेत हे कशा प्रकारचे नियोजन आहे? वाणिज्य आणि विज्ञान व इतर शाखांतील विद्यार्थी आणि शिक्षक ही माणसेच असतात ना? मग माणूसपण ओंजळीत घेण्याची शिकस्त करणारे साहित्य या माणसांपासून दूर का ठेवण्यात येते, हा आज प्रश्न निर्माण होतो. कारण या प्रकारच्या व्यवस्थेने आपल्या पर्यावरणाची विचित्र गोची केलेली आहे हे स्पष्ट दिसत आहे, हे कोणीही नाकबूल करणार नाही. शाखा कोणतीही असो प्रत्येकाला त्याच्या भाषेतील सकस साहित्य काय दिशा प्राप्त करतेय हे गांभीर्याने समोर ठेवले गेलेच पाहिजे. त्याच्याकडे केवळ रंजनाचा प्रकार म्हणून पाहणे, साहित्याच्या अभ्यासक्रमाला दुय्यम समजणे आपण आधी बंद केले पाहिजे.

स्वातंत्र्योत्तर वाटचालीत सुरू असणाऱ्या शिक्षण क्षेत्राकडे दृष्टिक्षेप टाकण्याची निकड लक्षात घेऊ. आपल्याकडे जे जे अभ्यासक्रम शिकवायचे असतात त्यांच्यामागे केवळ आर्थिक कारणाचा हेतू राखण्याची प्रथा दृढ बनवली गेली. माणूस म्हणून, व्यक्ती म्हणून मुलांचे व्यक्तिमत्त्व किती व कसे आकारले जावे हा वास्तविक अत्यंत महत्त्वाचा भागच आपण गौण करून टाकतो. तर आपल्याला या दृढ होऊन बसलेल्या हेतूंचा विचार सर्वप्रथम दुरुस्त करून घेता आला पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाची सांगड हळूहळू केवळ आर्थिक ध्येयाशी जी घालण्यात आली त्याच्या परिणामातून म्हणजेच जागतिक ग्राहकवादी धोरणांच्या

आहारी जाण्यातून आज आपण भोवताली ढासळते व्यक्तिमत्त्व निर्माण होताना पाहात आहोत असे म्हटले तर ते चुकीचे ठरेल काय? तेव्हा सुशिक्षित समाज निर्माण करू हे टिळकादिकांच्या वरकरणी तरी स्पष्ट वाटणाऱ्या ध्येयाचे आज काय झाले आहे त्याचा नेमका विचार आपण केला पाहिजे, त्याची डोळस चिकित्सा केली पाहिजे.

लोकमान्य टिळक म्हणत ग्रंथ हे गुरू! इतिहासाचार्य राजवाडे ग्रंथ हे समाज सुख होत असे म्हणत! तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी तर पुस्तक हे समाजाचे मस्तक होय आणि मस्तक हेच उत्तमांग! असे म्हणून ठेवलेय! (आपल्याकडे कर्मापेक्षा शुद्धीस अधिक प्राधान्य देण्याची प्रथा आहे. आणि शुद्धी ही ग्रंथ वाचनातून लाभू शकते.) या विचारांची आज पुनरावृत्ती आवश्यक झाली आहे.

साहित्याचे वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकास याचा विचार करताना वाचनापासून संबंधित समाज जो दूर होत आहे या वस्तुस्थितीचा व त्याला कारण असणाऱ्या घटकांचा आपल्याला समाचार घ्यावा लागेल. भारतीय सामाजिक वास्तव विचारात घेऊन येथे 'संबंधित समाज' ही संज्ञा उपयोजली आहे.

साहित्याचे वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकसन या विषयाच्या अनुषंगाने विचार करताना आपल्याला यामध्ये काही संज्ञा स्पष्ट दिसतात. साहित्य, वाचन आणि व्यक्तिमत्त्व या संज्ञा मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या मिळकती असल्याचे सर्व प्रथम आपण नीट लक्षात घ्यावे लागेल. या मिळकती वास्तविक मानवी वाटचालीतील सर्वाधिक वैशिष्ट्यपूर्ण मिळकती आहेत. माणूस हा असा एकमेव प्राणी या पृथ्वी तलावावरचा की ज्याने आपल्या नैसर्गिक शक्तींद्वारे आपल्याला विविध अंगांनी घडवत आणले. मुळात तो इतर प्राण्यांप्रमाणेच एक प्राणी. पण त्यांच्या तुलनेत मानवाने आपल्यात बदल करत स्वतःला सतत विकसनाच्या मार्गावर ठेवत आणले. आपले व्यक्तिमत्त्व कमावण्याचा प्रयत्न त्याने केला. स्वतःमधील अंगभूत कौशल्यांच्या मदतीने त्याने आपले एक नवीन जग निर्माण केले. भारतीय पातळीवरून ज्ञान आणि विज्ञान म्हणजेच आत्मज्ञान आणि प्रपंचज्ञान हे घटक समजून घेत आपली व्यक्तिमत्त्वाची उंची त्याने वाढवली. पण आजच्या आधुनिक पाश्चिमात्य तंत्रज्ञानमय पर्यावरणात भारतीयांचे आध्यात्मिक बैठक सांभाळणारे ज्ञान हे दुय्यम स्तरावर ढकलले गेले. ज्याला त्याला आज अमेरिका गाठायचे स्वप्न पडते या वास्तवाचा विचार करता आपण हे निश्चितपणे म्हणू शकतो की आपण 'भारतीय बैठक' प्रिय समजणारे दुय्यम स्तरावर ढकलले जात आहोत. तर या प्रकारचे ज्याला

समजते त्याच्यावर कोसळलेल्या गोंधळाच्या वातावरणातून बाहेर येण्यासाठी आपण आपल्या देशी सामर्थ्याचा शोध घेत उभे राहण्याचा प्रयत्न करणे आवश्यक होईल.

वास्तविक आपल्या ज्ञान परंपरा नेहमी नेमकेपणाने समाजासमोर आणल्या जात नाहीत. त्यांचा प्रस्थापित सत्ताधीशांच्या मर्जीनुसार विनियोग केला जातो. त्यामुळे अध्यात्म या संकल्पनेचाही आपण मर्यादित अर्थ घेऊन मोकळे होतो. ते काही तरी देवदेवतांचे म्हातारपणी करायचे वा समजून घ्यायचे प्रकरण आहे असेच आपण समजतो. पण तिथेच खरेतर आपण चूक करतो. अध्यात्म ही कुठल्याही देवदेवतांशी निगडित गोष्ट नाही. ती सांप्रदायिक पातळीवरून राबवायची कथाही नाही. तर ती व्यक्तीच्या विकसित व्यक्तित्वाची पावती आहे. आपण एकमेकाशी मिळून मिसळून कसे निःस्वार्थीपणे वाटचाल करावी याचे धडे देणारी ती शाखा आहे. आत्मज्ञान आणि प्रपंचज्ञान यांची सांगड घालण्याचे त्यात प्रेरक स्रोत आहेत. आपल्या आतील सत्त्व चिमटीत घेऊन त्याच्यावर प्रेम करणं आणि दुसऱ्याच्या अंतर्गतही तेच सत्त्व आहे हे मान्य करून त्याच्यावरही प्रेम करणं ही येथील मूळ बैठक माणूस माणसाशी जोडून देण्याचे काम करणारी आहे. आज सगळीकडे याच्या उलटे चित्र दिसते. कोणी कोणाशी सहमत होऊ नये, उलट दोन घटकांमध्ये अधिकाधिक अंतर कसे निर्माण होईल हेच अग्रक्रमाने पाहिले जात आहे. राजकीय विस्फुट प्रवृत्ती अधिक सतर्क होत गेल्याने अराजकता वाढीस लागते यावर विश्वास ठेवावा लागेल, असे दृश्य आपण पाहतोय. महत्त्वाच्या जागरणाला हास्यास्पद करण्याच्या वृत्ती वाढीस लावणे हा त्यातीलच एक भाग.

व्यक्तिमत्त्वाचा विकास साधण्यासाठी वाचन या गोष्टीची नितांत आवश्यकता असते हे कोणीही नाकबूल करत नाही. मग वाचन म्हणजे केवळ अक्षरांच्या माध्यमातील पुस्तकांचे वाचन म्हणजेच वाचन असा अर्थ घेता येईल का? अक्षरज्ञान निर्मिती ही शाखा अस्तित्वात येण्याआधीही वाचन ही प्रक्रिया मानवी वाटचालीत होती की नाही? हे दोन्ही प्रश्न आपल्याला वाचन या प्रक्रियेच्या गाभ्याकडे घेऊन जातील. साहित्याचे वाचन हे साहित्य निर्माण झाल्यावर सुरू होते आणि जीवनाचे वाचन हे साहित्य निर्मितीसाठी लेखकाचे आवश्यक कौशल्य असते. हे कौशल्य असल्याखेरीज साहित्य निर्मिती होणे शक्य नसते. तर वाचन या संज्ञेत आपल्याला लेखकाचे सभोवतालचे, पर्यावरणाचे वाचन आणि वाचकांचे वाचन हे दोन लंबक असल्याचे लक्षात घ्यावे लागेल हे स्पष्ट आहे. लेखक आणि वाचक या दोन्ही पातळीवरून घडणारे वाचन हे मानवी विकसित व्यक्तिमत्त्वाच्या

स्वरूपाचे दर्शन घडवते यात शंका नाही. या दोन्ही पातळीचा परस्पर विनियोग व्यक्तिमत्त्व निर्मिती सिद्ध करतो.

**व्यक्तिमत्त्व म्हणजे काय आणि व्यक्तिमत्त्वाची उंची वाढवणे म्हणजे काय?**

'व्यक्तिमत्त्व' ही संज्ञा आधुनिक जगात अधिक करून विचारात घेण्याची टूम आली. इंग्रजीत 'personality development' ज्याला म्हणतात तो व्यापारीकरणातील एक महत्त्वाचा टक्काच होऊन गेलाय. त्याचीही दुकाने बाजारात मांडली जात आहेत. भारतातील अनेक विद्यापीठेसुद्धा याचा अभ्यासक्रमात समावेश करतात. पण आश्चर्य म्हणजे विद्यार्थ्यांच्या भाषेत हा अभ्यासक्रम हाताळण्याऐवजी तो इंग्रजीत त्याच्यासमोर ठेवला जातो! प्रादेशिक भाषेतून येणारे विद्यार्थी कदाचित त्या अभ्यासक्रमातील मोठ्या मोठ्या इंग्रजी शब्दांचे स्पेलिंग पाठ करणे आणि ते परीक्षेत मार्क्स मिळविण्याच्या दृष्टीतून अभ्यासणे हे ध्येय ठेवत असतील. आणि इंग्रजी माध्यमातून महाविद्यालयात पोहचलेल्या विद्यार्थ्यांना कदाचित personality म्हणजे दुसऱ्यावर छाप टाकण्यासाठी उपयुक्त 'स्मार्ट लुक' असा अर्थ दिसत असेल. पण या व्यक्तिरिक्त personality हा शब्द काय सूचित करतो?

इंग्रजीत persona या धातूपासून personality हा शब्द बनतो. आणि persona या धातूचा अर्थ अर्थातच व्यक्ती असा होतो. आणि persona या धातूपासून बनलेला personality हा शब्द व्यक्तिमत्त्व हा अर्थ प्रसृत करतो. तेव्हा व्यक्तिमत्त्व या संज्ञेत व्यक्ती आणि व्यक्तिमत्व या दोन घटकांचा विचार अंतर्भूत आहे. जी व्यक्त होते तिला व्यक्ती असे म्हणायचे आणि अशा व्यक्त होणाऱ्या व्यक्तीला व्यक्तिमत्त्व प्राप्त होणे म्हणजे व्यक्तीचा विकास झालेला असणे हे ओघानेच येते. पण त्यामधील तिचा समाजाचा जोडलेला संदर्भ विसरता उपयोगाचे नाही. ही व्यक्ती समष्टीशी निगडित असते.

तर व्यक्त होणाऱ्या व्यक्तीचा समाज या वस्तूशी संबंध येतो व तो संबंध प्रस्थापित होतो तेव्हा व्यक्ती ते व्यक्तिमत्त्व असा प्रवास अस्तित्वात येतो. या प्रकारचा विकसनाचा प्रवास निसर्गाने निर्माण केलेल्या सर्व प्राण्यांमधील माणूस या एकमेव प्राण्याचा फक्त होत असतो. अर्थात माणूस याच प्राण्याच्या संदर्भातून 'समाज' ही वस्तू अस्तित्वात आलेली असल्याने हा प्रवास व्यक्तीला करता येतो. व्यक्तीचा विकास हा अर्थातच समाजात होत असतो. व्यक्ती, व्यक्तिमत्त्व आणि समाज हे तिन्ही घटक परस्पर अवलंबून असणारे घटक आहेत. आणि हेच

सर्व घटक साहित्याला व्यापून असतात. शिवाय त्यांच्या असण्याच्या सूक्ष्मातिसूक्ष्म नोंदी साहित्याने ठेवलेल्या असतात. त्यामुळे व्यक्तीच्या अस्तित्वांची, त्यांच्या अवकाशांची व्याप्ती लक्षात घेणे हे वाचकाचे व्यक्तिमत्त्व विकसित होण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचे ठरते.

त्यामुळे साहित्याचे वाचन हा व्यक्तिमत्वाच्या विकसन प्रक्रियेच्या माध्यमाचा घटक असून त्याचा विचार करताना हे तीनही बिंदू आपण लक्षात घेतले पाहिजेत. येथे साहित्याच्या वाचनाच्या संदर्भातून या तिन्ही घटकांचा विचार करण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत. साहित्याच्या संदर्भातून व्यक्ती, व्यक्तिमत्त्व आणि समाज यांचा विचार करणे हे काही नवीन आहे असे नाही. एरवीसुद्धा साहित्य हा समाजाचा आरसा असे आपण म्हणत असतोच. व्यक्ती स्वतःला याच आरशात निरखू लागली आणि जर तिला या आरशाने मान्यता दिली तर तिला व्यक्तिमत्त्व प्राप्त आहे असे म्हणता येते. मग ही समाजाची मान्यता प्राप्त करून व्यक्तिमत्त्व कमावलेली व्यक्ती अभ्यासणे साहित्याच्या वाचनांतर्गत महत्त्वाचे ठरते.

मानवी जीवन सुंदरतेने भरलेले आहे असे विधान साहित्याच्या प्रांतात आपण आलो की अधिक संपन्न बनून सामोरे येते. साहित्याने व्यक्ती आणि व्यक्तिमत्त्वे रेखाटलेली असतात. काय आहे याचा अर्थ? व्यक्ती म्हणजे काय आणि व्यक्तिमत्त्व म्हणजे काय? व्यक्ती ही एकटी असते आणि व्यक्तिमत्त्व हे व्यक्तीचा समाजाशी असणारा सकारात्मक संपर्क निदर्शित करत असते. आपल्यातील सर्वच व्यक्तींना व्यक्तिमत्त्व कमावता आलेले असतेच असे नाही. आपल्यापैकी ज्या काहींनाच व्यक्तिमत्त्व असते ते त्यांनी अर्थातच कमावलेले असते. व्यक्ती आणि व्यक्तिमत्त्व यांचा परस्पर सामना साहित्यकृतीत रेखाटलेला असतो. व्यक्तीच्या आंतरिक विकासाकरिता लागणारी तत्त्वे व्यक्तिमत्त्वात समाविष्ट असतात. मात्र व्यक्तीला व्यक्तिमत्त्वाची ओढ असली पाहिजे. ती सकस साहित्याच्या माध्यमातून निर्माण करता येऊ शकेल. साहित्याचे प्रभाव क्षेत्र असे ज्याला म्हणतात ते हेच. माणसाच्या सर्वांगीण विकासाकरिता आवश्यक असणारे जे तत्त्व घटक आहेत ते घटक एका व्यक्तीच्या माध्यमातून प्रकट होत असतात म्हणजेच त्याचे व्यक्तिमत्त्व (personality) प्रकटत असते. पुन्हा प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व हे वेगवेगळे (individualistic) असते, ते एकसारखे असत नाही. मानवी जीवनाचे सौंदर्य या भिन्नतेमुळेच तर असते. या प्रकारचे अभिजात जीवनाचे सौंदर्य केवळ साहित्य टिपून देत असते. त्यामुळे साहित्याच्या वाचनाला अन्य पर्याय आढळणार नाही.

तर एखाद्या व्यक्तीची अभिव्यक्ती ही समाजाशी जुळते तेव्हाच त्याला व्यक्तिमत्त्व विकसन म्हणतात. वास्तविक व्यक्तीची अभिव्यक्ती ही नेहमी समाजाशी निगडितच असते. समाज जेव्हा व्यक्तीच्या अंतरंगाला मान्यता देतो तेव्हाच त्याचे व्यक्तिमत्त्व आकारास येते, अन्यथा त्याला व्यक्तिमत्त्व म्हणता येत नाही. म्हणजेच सामाजिक घटकावर व्यक्तिमत्त्व पूर्णतः निर्भरित असते. समाज विविधतेने नटलेली वस्तू असते असे जे म्हटले जाते तेही याचमुळे. समाजात विविध प्रकारे व्यक्ती सामावलेल्या असतात. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीसारखी असत नाही. पण प्रत्येकाला समाज मान्यता देत असतो. कारण व्यक्ती समाजाच्या संदर्भातूनच आपापले व्यक्तिमत्त्व विकसित करत असते. समाज हा अगणित मितींनी युक्त वस्तू होय. या प्रकारच्या अगणित मितींनी युक्त समाजाला परिवर्तनाचे आवाहन देणारी साहित्यकृती म्हणूनच महनीय घटना होय.

व्यक्तिमत्त्व म्हणजे इतर व्यक्तींना प्रभावित करणारी तत्त्वे व्यक्तित्वात असणे. त्यामुळे समाजमान्यता प्राप्त झाल्याशिवाय व्यक्तिमत्त्व आकारास येत नाही. तुकाराम, बसवेश्वर, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, गांधीजी यांच्यासारखी व्यक्तिमत्त्वे समाजाला प्रभावित करणारी व्यक्तिमत्त्वे असतात. त्यांना समाज मान्यता देतो त्यामुळे व्यक्तीच्या मनावर त्यांचा प्रभाव पडत राहतो आणि समाज हा 'समाज' म्हणून घट्ट होत असतो. आणि त्याचबरोबर सामाजिक घटकांवर व्यक्तिमत्त्वे पूर्णतः निर्भरित असतात हेही त्यातून आपण अधोरेखित करू शकतो.

समाजाच्या संदर्भातून व्यक्ती आपले व्यक्तिमत्त्व विकसित करत असते हे वर आपण म्हटलेच. व्यक्तिमत्त्वाचे विकसन झटपट घडणारी गोष्ट नसते ते हळूहळू घडत असते. भाषा, वर्तन, वृत्ती, प्रवृत्तीच्या व संस्कृतीच्या माध्यमातून हे विकसन होत असते. समाजातून व्यक्तीचे बोलणे, कृती करणे, त्याची ध्येयधोरणे यांचे परावर्तन (reflection) होत असते व त्यातून व्यक्तिमत्त्वे विकसित होत असतात. व्यक्तिमत्त्व हे संपूर्ण समाजाच्या परावर्तनाची (वर्तन व्यवहारांच्या माध्यमातून परावर्तन, जसे किरणांचे परावर्तन होत असते तसेच वर्तनांचेही परावर्तन समाजात होत असते. साहित्यकृतीने सामाजिक असणे म्हणजे हेही...) आविष्कृती होय. व्यक्तीच्या वर्तनाचे परावर्तन समाजात समाजाकडून घडत असते. ते परावर्तन म्हणजेच व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व. समाज व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे परावर्तन करत असतो. व्यक्तिमत्त्व म्हणजे व्यक्ती आणि समाज यात चालणारा बिंब-प्रतिबिंब वाद होय. म्हणूनच आपण आजवरच्या सर्व कसदार बंडखोर लेखकांना आपले

व्यक्तिमत्त्व प्राप्त लेखक असे संबोधत असतो.

समाजात, जगण्यात काय आहे ते नीट आत घेऊन काय असायला हवे हे आविष्कृत करणारा साहित्यिक सकस साहित्यकृती देत असतो. असे मजबूत वाङ्मयीन चारित्र्य प्राप्त असणाऱ्या साहित्यकृतींचे वाचन म्हणजे वाचकांनी आपले व्यक्तिमत्त्व कमावण्याचा प्रयत्न होय. या प्रक्रियेशिवायही व्यक्ती असतातच समाजात... त्या प्रकारच्या समाजाला साहित्यबाह्य समाज असे संबोधू. या साहित्यबाह्य समाजात ग्राहकवाद मोठ्या प्रमाणात यशस्वी होत जाईल. कोणत्याही प्रकारचा स्वतंत्र विचार तिथे शिवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. दूरदर्शनवर दाखवल्या जाणाऱ्या सर्व जाहिरातीच या प्रकारच्या समाजाच्या गुरू बनतात! कोणतेही आंधळे व अतिरेकी आव्हान या समाजाला स्पर्शते आणि त्यात त्याचा बळी जातो. याप्रकारे व्यक्तिमत्त्वहीन बनलेल्या समाजात भ्रष्ट वर्तनांची बजबजपुरी माजते. आज आपण प्रत्येक वस्तू अशी भ्रष्ट होत निघालेली पाहतो आहोत. अगदी बालकाच्या दुधासारख्या पवित्र अन्नातसुद्धा बिनदिक्कत भेसळ केली जात आहे. आपण समाजाचे देणे लागतो ते तत्त्व पूर्णतः विस्मरणात टाकण्यात येत आहे.

व्यक्तिमत्त्व हे समाजात अधोरेखित होत असते. व्यक्तीने आपल्या वैयक्तिक साधनेतून कितीही ज्ञान प्राप्त केलेले असले पण समाजाशी त्या ज्ञानाचा दुरन्वयानेही काही संबंध पोहचत नसेल, कोणतेही देणेघेणे राहिलेले नसेल तर त्याच्या शून्य उपयोजनामुळे त्याचे मूल्यही शून्य बनते. एखाद्या संन्याशाने हिमालयात बसून पुष्कळ साधना केलेली असेल पण त्याच्या साधनेतून प्राप्त झालेल्या विद्येचा समाजात कोणताही विनियोग झाला नाही तर त्या विद्येचा काय उपयोग? एखाद्यामुळे समाजात जोवर परावर्तन घडत नाही तोवर त्याचे व्यक्तिमत्त्व आहे असे म्हणता येत नाही. समाज त्या व्यक्तीकडे कसे पाहतो त्यावर हे सर्व अवलंबून. समाज गांधीजींकडे कसे पाहतो, नेहरूंकडे कसे पाहतो किंवा कोणत्याही व्यक्तीकडे कसे पाहतो त्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप अवलंबून. त्यालाच त्या व्यक्तीची नैतिकता, चारित्र्यसंपन्नता असे संबोधले जाते. तर व्यक्तीचे समाजाच्या संदर्भातून विकसन म्हणजे व्यक्तिमत्त्व. तिथे अस्तित्वात आलेला जिवंत प्रवाही देवघेवीचा प्रत्यय व त्याची अनुभूती व्यक्तिमत्त्व निर्माण झाल्याची ती साक्ष होय.

एखाद्या व्यक्तिमत्त्वाचा आपल्यावर प्रभाव पडणे, त्याच्या चालण्याबोलण्याने, भूमिकेने आपण प्रभावित होणे व त्यायोगे आपले चारित्र्य परावर्तित होऊ लागणे

यात आपल्या व्यक्तिमत्त्वाचे विकसन आहे. आणि जर आपण कोणत्याच व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होत नाही अगर चारित्र्य गुण प्राप्त करत नाही, सतत परिवर्तन ही नैसर्गिक बाब आपल्याला स्पर्शत नाही तर तिथे आपण संवेदना हरवून बसलेले आहोत असे सिद्ध होईल. साहित्यकृती आपले व्यक्तिमत्त्व घेऊन समाजात उभ्या असतात, त्यांच्या निकट जाऊन त्यांच्याकडून किरण प्राप्त करणे आणि त्यांचे परावर्तन आपल्या रोजच्या वर्तनातून देणे ही आपण जिवंत असल्याची लक्षणे ठरतात. तर समाज जिवंत माणसांचा आहे की नाही हे साहित्यकृतीच्या वाचनाशी निगडित प्रक्रिया स्पष्ट करतात. (अशा कोणकोणत्या साहित्यकृती? ज्यांना या दृष्टीने व्यक्तिमत्त्व प्राप्त आहे? समाजात त्यांचे परावर्तन घडलेले आहे? नेमाडे यांचे सर्व नायक आणि म्हणूनच लेखक भालचंद्र नेमाडे हे मराठीतील व्यक्तिमत्त्व प्राप्त लेखक ठरतात.)

व्यक्तीचा समाजाशी संबंध आल्यावर तिथे भाषा, संवाद, धर्म, तत्त्वज्ञान अशा जीवनाला पोसणाऱ्या आवश्यक अशा सर्व गोष्टी येतात. जीवनाला आवश्यक असे सर्व घटक ज्या व्यक्तीत वास करत असतात त्यांचे विकसन समाजाच्या संदर्भातून घडल्यावर समाज ती वैशिष्ट्ये परावर्तित करतो त्या व्यक्तीवर. मग ती व्यक्ती त्या समाजाकडून परावर्तित घटकांचे उपयोजन कशी करते त्याला तिचे व्यक्तिमत्त्व म्हणायचे. समाज सकारात्मक आरोप करतो व्यक्तिमत्त्वाचा एखाद्या व्यक्तीवर तर तिथे व्यक्तिमत्त्व आकारले. व्यक्तीच्या अस्तित्वाचा समाजावर जो प्रभाव पडतो त्यातून समाज जी परतफेड करतो त्याला व्यक्तिमत्त्व असे म्हणतात. विकसित होऊन ते व्यक्तिमत्त्व सर्वांना दिसले पाहिजे. एकट्याचे तिथे काम नाही. या कारणानेही साहित्य हे क्षेत्र अनेक आवाजी क्षेत्र आहे म्हणून व्यक्तिमत्त्व प्राप्त करण्यासाठी साहित्याची संगत उपयुक्त.

व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी समाजाशी संवाद असावा लागतो, स्वतःशी संवाद असावा लागतो. संवाद म्हणजे तिथे भाषेचा थेट संबंध आला. संवादी भाषा हेच माध्यम घेऊन साहित्य कार्यरत झालेले असते. साहित्याच्या भाषेचा आजवर अनेकांनी विचार केलेला आहेच. दृक, श्राव्य कौशल्यांचा वापर करत हे भाषेचे माध्यम आपले म्हणणे वाचकांच्या अंतरंगात ओतत असते. जीवनात विकसित झालेली विविध अंगे-प्रत्यंगे आपल्यामध्ये समाविष्ट करून घेत असते. जीवन विविध प्रकारे संपन्न असते. त्याची अनुभव समृद्धी थक्ककारक असतेच; पण त्या केवळ अनुभव मांडणीपुरते साहित्य असत नाही तर चित्रित जीवनानुभव

वाचकाला प्रचितीच्या माध्यमातून अनुभूतीच्या पातळीवर पोहचवतो हे त्याचे वैशिष्ट्य होय. त्यामुळे वाचक असणाऱ्या व्यक्तीचाही व्यक्तिमत्त्व प्राप्तीकडे प्रवास शक्य होतो.

**कसदार साहित्यकृती वाचकाला आणि समाजमान्य व्यक्ती समाजाला व्यक्तिमत्त्व प्राप्त करण्यात मदत करतात –**

प्रभावी साहित्यकृती आपल्या नैतिक भूमिका घेऊन उभ्या राहतात. मानवी समाजात अनेक तत्त्वांचे, विचारांचे, संवेदनांचे, जाणिवांचे, संकेतांचे, संकल्पनांचे प्रवाह वाहात येत असतात. त्या सर्व पर्यावरणातून साहित्यकृतीचा अनुषंगाने साहित्यिकाचा कलात्मक निवड, चाळणघोळणमिसळण (Artistic selection and elimination) इत्यादितून संरचना साधण्याचा प्रयत्न होत असतो. समाजाच्या वाटचालीत काही महत्त्वाची व्यक्तिमत्त्वे आपापले प्रभाव वलय निर्माण करून असतात. त्यांच्या कृतींना प्रतिकृती तयार करणे, त्याच्या क्रियांना प्रतिक्रिया देणे हेही साहित्यातून सुरू असते.

रवींद्रनाथ टागोर यांनी गांधीजींना महात्मा असे संबोधित केले, गांधीजींचे व्यक्तिमत्त्वच असे होते की त्यांना महात्मा म्हणून मान्यता देण्यात समाजाला कोणतीच अडचण वाटली नाही. फुले, आंबेडकर यांसारख्या व्यक्तिमत्त्वांचा महात्मा म्हणून समाज स्वीकार करतो. राजा शिवाजी यांचे स्वराज्यनिर्मितीचे स्वप्न व त्यासाठी त्यांनी टाकलेली पावले हे समाजापुढील एक उदाहरण ठरते. तसेच मार्क्स ही व्यक्तीही अलीकडची संपूर्ण जगभर आपला प्रभाव टाकून गेलेली व्यक्ती आपल्या दृष्टीसमोर असते. तर अशा महनीय कृती करून गेलेल्या माणसांना व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता देऊन समाज त्यांचे परावर्तन आपल्यात करत असतो. समाज साधत असलेले महात्मापणाचे परावर्तन आपण कसे स्वीकारतो, त्याचे उपयोजन आपल्या जगण्यात कसे करतो त्यातून आपल्या व्यक्तिमत्त्वाची निश्चिती होत असते. साहित्यिक आणि सामान्य वाचक यात एक मुख्य फरक असतो तो हा की पर्यावरण श्रेष्ठ साहित्यिकाशी अनेक अंगांनी संवाद साधत असते तसे वाचकाशी किंवा सर्वसामान्य माणसाशी ते साधत नाही. पण माणसाची आस्था बाळगणाऱ्या लेखकाने साधलेल्या अशा संवादातून निर्माण झालेल्या साहित्यकृतीत मात्र सामान्य वाचकाशी संवाद साधण्याच्या प्रक्रिया उपस्थित असतात. साहित्याचे वाचन वाचकाला पर्यावरणाची डोळस कल्पना देण्यात यशस्वी होत असते.

जशी समाजाला पुढे नेणारी, त्याला योग्य आकार देऊ पाहणारी वर उद्धृत

केली त्या प्रकारची महनीय व्यक्तिमत्त्वे जगावे कसे, हे शिकवत असतात. तसेच त्यांच्या प्रभावाने प्रेरित झालेल्या पर्यावरणातील साहित्यसुद्धा वाचकांना जगावे कसे हे शिकवत असते. जगण्यावर प्रेम करावे कसे, हे साहित्य शिकवत असते. जगण्यावर प्रेम करणे जमवता आले नाही तर त्या जगण्याला काय अर्थ उरतो हा प्रश्न साहित्यावाटे उपस्थित होतो तेव्हा तो तळामुळातून हलवून सोडतो. व्यक्तीने आपल्या जीवावर, आपल्या जगण्यावर प्रेम जडवले पाहिजे. तरच ती व्यक्तिमत्त्वाच्या प्राप्तीची हक्कदार होऊ शकते. प्रेम व अहं यांच्या परस्परसंबंधातील धाग्यांच्या चिकित्सा चांगले साहित्य करत राहते. त्यातून वाचकाला उत्तुंगताही वाट्यास येऊ शकते. अस्तित्वाचा शोध व बोध त्यात अर्थातच निर्माण करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात असते. श्रेष्ठ साहित्यकृती ही त्या त्या काळातील अस्तित्व ओंजळीत घेऊनच वाटचाल करत असते.

विकसन ही सातत्यशील प्रक्रिया आहे, माणूस अगदी सर्वोच्च स्थानापर्यंत पोहचतो खरा पण त्याचे सतत विकसन सुरू असणे हे निकोप असण्याचे लक्षण होय. या निकोपपणातून व्यक्तिमत्त्व मिळविण्याचा मार्ग जात असतो. वास्तविक लेखकाला विकसित करण्यात वाचकाचाही संबंध पोहचत असतो. साहित्यकृतीबाबत वाचकाच्या प्रतिक्रिया महत्त्वाच्या असतात. लेखक आणि वाचक यांच्यामध्ये जीवनानुभूती ग्रहण करणे आणि 'समाजाचे देणे' लक्षात घेणे या कसोट्या समान स्वरूपात कार्यरत असतात. या कसोट्या उंच व्यक्तित्व निर्माण होण्याच्या प्रक्रियेत सक्रिय असतात.

**आपण भारतीय व्यक्तिमत्त्व प्राप्त आहे असे कोणाबाबत म्हणत असतो?**

रामकृष्ण परमहंस, श्री अरविंद ही अध्यात्मातील अंतिम व्यक्तिमत्त्वे म्हणून लक्षात राहतात, गांधीजी ही राजकीय व्यक्तिरेखा म्हणून विकसित कशी झाली हे लक्षात घेणे एक आव्हान ठरते. आपले व्यक्तिमत्त्व आपण स्वतः विकसित कसे करतो त्यालाच अध्यात्म म्हणतात. भारताची भूमी या अर्थी वास्तविक नेहमी व्यक्तिमत्त्व विकासाला केंद्रवर्ती ठेवण्याच्या प्रेरणा प्रस्तुत करते. मध्ययुगात तर या गोष्टीला फार मोठा उठाव सर्व भाषांतील संतांनी दिलेला होता. मराठी संस्कृतीत ज्या विठ्ठलाचे वेड लावून घेतले गेले तो विठ्ठल हा विकसित व्यक्तिमत्त्वाचा अंतिम दाखला असतो. समाजशील असणे म्हणजे काय ते स्पष्ट करताना विठ्ठलाहून अन्य उदाहरण आढळणार नाही. मध्ययुगाने अक्षरांमध्ये जो या देशात भाव भक्तीचा, तत्त्वज्ञानाचा प्रपंच मांडला तो याचसाठी मांडला. याच दृष्टीतून भारतीय

तत्त्वज्ञानाची आध्यात्मिक बैठक जीवावर प्रेम करा म्हणून सांगत आली. स्वतःवर जो प्रेम करायला शिकतो तोच इतरांवर प्रेम करू शकतो. स्वतःवर प्रेम जडल्याशिवाय सृष्टी चिरंतन राहू शकत नाही, सृष्टी चिरंतन टिकवणे हेच भारतीय भूमीचे ब्रीद राहते... त्याच हेतूने जीवाचे वर्तन, जगण्यातील नैतिकता या सर्व गोष्टी पुढे ठेवण्यात येतात. तर याप्रकारे जीवनाबद्दल आसक्ती निर्माण करणे म्हणजेच अध्यात्म. देवाबद्दल आसक्ती म्हणजे अध्यात्म नव्हे. व्यक्ती/जीव आणि समाज यात परस्परसंबंधाचे धागे नीट समजून घ्या, असे आपल्याकडील प्रत्येक चांगला ग्रंथ सांगत राहतो. माणसाला शोधण्याचे, त्याच्याशी संवाद उपस्थित करण्याचे बाळकडू देत राहतो. स्वतःच्या जीवाला टिकवणे आणि त्याचबरोबर इतरांच्या जीवांची निगा राखण्याची नैतिकता बाळगणे हे व्यक्तिमत्त्वाचे महत्त्वाचे अंग म्हणून आपण भारतीय स्वीकारतो. महात्मा गांधीजी यांच्या माध्यमातून हेच अंग प्रभावीपणे जगासमोर प्रकटले आणि संपूर्ण जग जे मुळातून युद्धकेन्द्री होते ते 'अशी युद्धे नकोत की ज्याच्यातून जिवांची कत्तल करण्यातच पौरुष असल्याचे मानले जाईल' या तत्त्वावर येऊन निश्चल झाले. अक्षरांची दुनिया 'टिका आणि टिकवा' हा मंत्र प्राणभूत मानते. तर साहित्य या प्रधान कलेचे माध्यम अक्षरात लिहिलेले शब्द हे आहे. शब्द या माध्यमातून साहित्यात चित्र काढून दाखवले जाते, रंग उधळून दाखवलेले असतात, स्वरांची नादांची लयींची आतषबाजी साधून दर्शवलेली असते. अर्थांचे अनेकानेक अन्वयार्थ लावण्याची कला ओतप्रोत भरून प्रस्तुत केलेली असते. जगण्यात बहार निर्माण करणारे विविध रस साहित्यात नर्तन साधत असतात. 'ये हृदयीचे ते हृदयी घातले' याचा अवीट आनंद येथे मुक्त हस्ताने दान देत व घेत असतो. इतर सादरीकरणयुक्त कला क्षणिक आस्वादाची उदाहरणे ठरतील; पण साहित्य ही अशी प्रधानकला आहे की तिचा आस्वाद हा क्षणभंगुर असत नाही, तो मनःपटलावर कायमचा कोरला जातो. व्यक्तिमत्त्वावर त्याची कायमस्वरूपी छाप राहते. भूमिका निर्माण होतात, भूमिकेत बदल घडतात, परिवर्तन हा निसर्गनियम साहित्याने चिमटीत घट्ट पकडलेला असतो. व्यक्तीच्या अंतरंगाचे स्वतंत्र रसायन निर्माण करण्याचे अंतिम साध्य तिथे सिद्धीस जात असते. व्यक्तिमत्त्व घडत जाते. अंतःकरण विशाल बनत जाते. शब्द आणि अर्थ ह्या शक्तींचा स्पर्श माणसात आत्मविश्वास निर्माण करत राहतो. अन्वर्थक वाकसिद्धी ही सर्वाधिक समर्थ करणारी गोष्ट लाभते. या सिद्धीतूनच आकलनाचा मार्ग सुकर होईल. भावनिक आणि वैचारिक अंगांची मजबुती निर्माण होत जाईल. समाजात सुसंवाद अस्तित्वात येत जातील.

**अनेक महत्त्वाच्या घटकांनी युक्त साहित्यशाखा आजकाल उदासीन का?**

अर्थकेंद्री बनलेल्या आधुनिक काळात जगभर प्रामुख्याने पाश्चिमात्य जगात तंत्रज्ञान ही शाखा विकसित झाली. आणि त्या शाखेने संपूर्ण विश्व प्रभावित करून ठेवले. वास्तविक ही शाखासुद्धा व्यक्तीच्या विकसनासाठी आवश्यक असे माध्यमच. तंत्रज्ञान माणसाच्या वेळा वाचवण्यासाठी उपयोजित झाले. माणसासाठीच हे सगळे शोध घेतले गेले. ते जेव्हा माणसासाठी असते तेव्हाच त्यात संस्कृती आहे असे म्हणता येईल. कोणतीही बोंब निर्माण करणं यात संस्कृती असत नाही. जीवनाला अधिकाधिक सुंदर करायचे हा हेतू तिथे ठेवला जावा. जीवन सुंदर करणे याचा अर्थ नीट लक्षात घेतला जावा. माणसाला जगण्याची व्यवधाने नेहमी नको इतकी व्यस्त ठेवतात. त्याला आपल्या मनाच्या सुखासाठी निवांत वेळ द्यायचा असतो पण तो त्याला मिळतो कुठे? ही निवांतपणाची निकड भागविण्यासाठी तंत्रज्ञान शाखेने धावून यावे. जे काम चार तास लागून होत असे ते या नव्या शोधांमुळे पाच मिनिटात आपल्याला उरकता येते. मग त्यातून उरलेला कालावधी आपल्या कलात्मक आनंदासाठी माणूस उपयोगात आणू शकतो. साहित्याचा आनंद घेण्यासाठी त्याला निवांतपणा आवश्यक असतोच.

कोणतीही कला आस्वादण्यासाठी माणसाला निवांतपणा लागतो असे आजचे गणित होऊन बसले. पूर्वीच्या जीवनपद्धतीत रोजची नित्य व्यवहारांची कामे गीतांच्या, ताल नृत्यांच्या, लयदार विधीविधानांच्या संगतीत करण्याच्या प्रथा होत्या. पण आधुनिक काळात जीवनाचे स्वरूपच बदलले. जुन्या गोष्टी मागासलेल्या ठरवून मागे टाकल्या गेल्या. आपल्या जीवनात अर्थ सोडून अन्य 'समृद्धी' निर्माण करणे यासाठी वेगळा निवांतपणा आवश्यक होऊन बसला. वेळ वाचविणे, तिचा सदुपयोग करणे हा संस्कृतीचाच एक महत्त्वाचा भाग होऊन गेला. वेळ वाचवावा; तो वाचलेला वेळ आपण कलांच्या आस्वादातून लाभणाऱ्या आनंदात घालवावा. आजची संस्कृती तंत्रज्ञानातून अशी सुखी करू पाहते. पण यातूनच कलांचा केवळ चंगळवादी व्यापारी व्यवहार घडत असलेला दिसतो आणि त्यामुळे आपल्या चिंतेत भर पडते. मग अशावेळी चंगळवादाचा अतिरेक जर विध्वंसक होत असेल तर निराळी सावधानता बाळगणे गरजेचे होणार नाही का? त्यासाठी वास्तविक आज श्रेष्ठ साहित्यकृतींचे वाचन ही चळवळ आकारास आणणे निकडीचे बनते.

मिळालेली निवांतता तुम्ही कुठे वापरता? ती कशी वापरता? यातूनच आपली संस्कृती दृग्गोचर होत जाईल. तात्पर्य माणसासाठी जास्तीतजास्त अनुकूलता निर्माण करून देण्याच्या हेतूने तंत्रज्ञानाचे संशोधन सुरू झालेले असेल तर ते मान्य करता येईल. (पूर्वीचे स्वैपाकपाणी आणि आताचे यात भेद झाला आहे ना?) ही मानवी अनुकूलतेची संस्कृती जी आहे ती महत्त्वाचीच आहे; पण त्याच्या बरोबरीने आपल्या बौद्धिक, भावनिक, सांस्कृतिक, सामाजिक, समृद्धीचे मार्ग आपण बंद करून केवळ जागतिक ग्राहकवादाच्या नादी लागणे योग्य ठरत नाही. तर संस्कृतीत होणाऱ्या बदलांमधील मुख्य अस्तित्वावरच घाला घालू बघणारे सूक्ष्म धोकेही साहित्याच्या प्रांगणात अचूक अधोरेखित होऊन ते व्यवस्थित हाताळले जाऊ शकतात. आपल्या भूमिकांचे गांभीर्य राखण्याचे बाळकडू तिथे असू शकते, परिवर्तन आणि वर्तन यांच्यातील ताळमेळ अचूक जोपासण्याचे अंगभूत कौशल्य समाजाला साहित्याच्या वाचनातून प्राप्त होऊ लागते. पण तसे होण्यासाठी वाचन हे डोळस वाचन असले पाहिजे हे मात्र ओघानेच येते. केवळ घोकंपट्टी, वाक्येच्या वाक्ये तोंडपाठ म्हणणे, कवितांवर कविता तोंडपाठ करणे म्हणजे डोळस वाचन होत नाही. केवळ 'स्मृती' आणि 'श्रुती' यांच्यातून डोळस होता येत नाही. त्यासाठी अनुभव-अनुभूती-प्रत्यय-आस्वाद-परकायाप्रवेश-वाचन-मनन-चिंतन-आकलन-पडताळणी करत चिकित्सक भाषण, लेखन या प्रक्रियेतून प्रवास होणे महत्त्वाचे बनते. लीळाचरित्रात चक्रधरांनी त्याच वेळेस समाजाचे डोळस आकलन कसे असावे आणि व्यक्तीचे समजून घेणे कसे असू नये, याचे चित्र आपल्यासमोर ठेवलेले आहेच. त्यांचा 'रुंभणेयाचा दृष्टांत' आपल्याला आठवला असेलच.

समाजाने वाचावे कसे, विचार करावा कसा, प्रस्थापित व्यवस्थेचे कावे अचूकतेने हेरावे कसे, चालत आलेल्या परंपरांचीही धिटाईने चिकित्सा करावी कशी, प्रस्थापित समाजात शोषक व शोषित असे घटक असतात म्हणजे काय, जात, धर्म, पंथ, लिंग, स्तर, वर्ण या पातळींवर समाजात कसे विघटन करण्यात आलेले आहे ते साठोत्तरी मराठी साहित्याच्या प्रवाहाने वाचकांच्या लक्षात आणून दिले आहेच. अण्णा भाऊ साठे, बाबुराव बागुल यांच्या लेखणीने शोषितावस्थेतही माणूस कसा जिवंत असतो त्याचे प्रत्यय देऊन मोठे कार्य केलेय. भाऊ पाध्ये, भालचंद्र नेमाडे, नामदेव ढसाळ, अरुण कोलटकर आदि लेखक मराठी समाजातील श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वे असून त्यांच्या लेखणीतून समाजाला व्यक्तिमत्त्व देण्याची सामर्थ्ये झिरपतात.

**व्यक्तिमत्त्व प्राप्त साहित्यिकांच्या साहित्यकृती काय काम करत असतात?**

साहित्यकृतींचे वाचन आणि वाचकांच्या व्यक्तिमत्त्वाची समृद्धी या संदर्भातून सानेगुरुजी, अण्णा भाऊ साठे, भाऊ पाध्ये, विभावरी शिरुरकर, व्यंकटेश माडगूळकर, बाबुराव बागुल, अरुण कोलटकर, भालचंद्र नेमाडे, राजन गवस इत्यादींसारखा आपला वाचकवर्ग निर्माण करणाऱ्या आधुनिक काळातील लेखकांच्या साहित्यकृती दृष्टीसमोर ठेवून त्यांच्या वाचनातून आपण कसे अनुभवाने, जीवनाच्या समृद्ध आकलनाने संपन्न बनत जातो, त्याची आठवण करता येईल. यशस्वी साहित्यकृती अतिशय सोपी, सहज, सुटसुटीत भाषा बोलत असतात. त्या साहित्यकृती वाचकाशी बोलत असतात. त्यातील चित्रित व्यक्तिरेखा मानवी जगण्यात येणाऱ्या अनुभवांची प्रचिती वाचकांना देत असतात. अनुभव अनुभूतीच्या पातळीवर जातो. अनुभूतीमधून अभिवृद्धी साधली जात असते. अभिवृद्धी सभोवतालाशी डोळस संवाद साधायला भाग पाडत असते. जीवनात दृढ होऊन बसलेल्या शोषण परंपरा चिकित्सक पद्धतीने लक्षात घेऊन परिवर्तन ही निसर्गाची हाक योग्य रीतीने वाचकाच्या मनापर्यंत पोहचवत असते. विशुद्ध जगण्याची गाथा ओंजळीत घेण्याची अनुभूती चांगल्या साहित्यकृती वाचकाला देतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे परावर्तन वाचकांच्या वर्तनाद्वारे समाजात निर्माण होत राहते. आपल्या जगण्याशी प्रामाणिक राहण्याची एक मौलिक नैतिकता यायोगेही प्रसारित होऊ लागते.

कसदार साहित्यकृती समृद्ध अनुभवयुक्त असते. म्हणूनच ती वाचकाला कळत नकळत विकसित करत असते आणि असा भाषिक पातळीवरून व्यक्तिमत्त्व संपन्न करणारा अनुभव वाचन संस्कृतीशिवाय अन्यत्र लाभणे खरोखरच दुर्लभ!

साहित्य जसे मानवी आदिमता चित्रित करू पाहते तसेच कालनिष्ठ जाणिवाही प्रकर्षाने आविष्कृत करत असते. कालनिष्ठ जाणिवांचे दोन प्रकार असतात. एक व्हर्टिकल आणि दुसरे हॉरीझोंटल. एक उभा छेद आणि दुसरा प्रसरणशील जागतिक. साहित्याच्या माध्यमातून वास्तविक काहीसे वैश्विकीकरणही घडवले जात असते. भगवतगीतेकडून व्हीटमन, इमर्सन यांना प्रेरक स्पर्श लाभतो. आणि तिकडच्या टोअनबी, मिल्टन, इझ्रा पाउंड यांच्याकडून आपले कवी काही मिळवतात. जैन, बुद्ध यांच्याकडून जगाने अहिंसा हे तत्त्व घेतले. ख्रिश्चन धर्माच्या संस्थापकावर बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेला असतो आणि पुन्हा गांधीजींचे अहिंसेचे तत्त्वज्ञान हे थोरो आणि टोलस्टोय यांच्याकडूनही प्रेरित झालेले असते. या

प्रकारची देवघेव जगाला समृद्ध करतच असते, त्याचबरोबर जगाला एकमेकांत गुंतवूनही ठेवत असते. येथून तिथे जाणे आणि तिथून पुन्हा येथे येणे असे घडत राहते. ग्रंथांच्या दुनियेमुळे जगात......? याखेरीज ग्रंथ जगण्यातील सुखदुःखे संपन्न बनवत राहतात. करुण रस साहित्यात श्रेष्ठ स्थानी असतो आणि महत्त्वाचे म्हणजे तो प्रत्यक्षातील दुःखे पचवण्याची क्षमता निर्माण करत असतो. (Sweetest songs are those which tells the saddest thoughts! हे तर सर्वश्रुत आहेच.) तात्पर्य साहित्यात खूप सामर्थ्ये असतात! चला वाचनातून ती प्राप्त करू!

■